Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 16 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १६ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

सिंगापूरचे अध्यक्ष थरमन षण्मुगरत्नम भारत दौर्यावर आले असून, राष्ट्रपती भवनात आज त्यांचं औपचारिक स्वागत करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचं स्वागत केलं. पंतप्रधान मोदी आणि षण्मुगरत्नम यांच्यात आज द्विपक्षीय चर्चा होणार आहे.

****

मुंबई, चेन्नई,कोलकाता, बंगळुरु, हैदराबाद, कोचिन आणि अहमदाबाद विमानतळांवर जलदगती इमिग्रेशन म्हणजे देशप्रवेश प्रवासी विश्वास यंत्रणेचं उद्घाटन आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. या यंत्रणेमुळे प्रवाशांना जागतिक दर्जाच्या इमिग्रेशन सुविधा मिळणार आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रवास सहज आणि विनाअडथळा होण्यासाठी मदत होईल. या प्रणालीची अंमलबजावणी देशातल्या २१ विमानतळांवर केली जाणार आहे.

****

मकर संक्रांतीच्या पुण्यपर्व काळात प्रयागराज इथं आयोजित महाकुंभमेळ्यात आतापर्यंत सुमारे साडेतीन कोटी लोकांनी अमृत स्नान केलं आहे. या मेळ्यात सरकार एकूण स्वच्छता तसंच भाविकांसाठी स्वच्छ आणि दर्जेदार जेवण पुरवण्यावर विशेष लक्ष देत आहे. या भव्य आणि दिव्य कुंभमेळ्यानं जगभराचं लक्ष वेधून घेतलं असून यात भाग घेण्यासाठी दहा देशांच्या एकवीस सदस्यांचं पथक आज संगमावर पवित्र स्नान करणार आहे.

****

महाराष्ट्र राज्य सीईटी परीक्षेसाठीच्या 'अटल', या ऑनलाइन नोंदणी प्रणालीचं उद्घाटन उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते काल झालं. राज्य सामायिक प्रवेश कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या विविध व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षांचा सराव करता यावा म्हणून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी उपयुक्त ठरेल, असं पाटील यांनी म्हटलं आहे.

****

राज्यात काल अन्न आणि औषध प्रशासन विभागाने एकाच दिवशी दूध भेसळ तपासणी मोहीम राबवली. यावेळी विविध ठिकाणाहून दुधाचे एक हजार ६२ नमुने विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आले. यामध्ये विविध ब्रान्डच्या दुधाचे ६८० पाउच तसंच पिशवी पॅकिंग आणि ३८२ सुट्या स्वरूपातील दुधाचा समावेश आहे. या तपासणी नमुन्यात दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना प्रशासनास देण्यात आल्याचं, अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितलं.

****

केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक आणि सूचना प्रौद्योगिकी मंत्रालयाच्या वतीनं, डिजीटल इंडिया आपले सेवा केंद्र, हा नवीन पथदर्शी प्रकल्प राज्यात सर्वप्रथम छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या प्रचारासाठी तयार करण्यात आलेल्या जनजागृती मोबाईल व्हॅनला काल जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आलं. या प्रकल्पात प्रत्येक ग्रामपंचायतीत एक डिजीटल इंडीया सेवा केंद्र बनवण्यात येणार असून, यात बँक ग्राहक सेवा केंद्र, आधार अद्ययावतीकरण केंद्र यांचीही सेवा उपलब्ध असेल. या प्रकल्पाबद्दल जनमानसात जागृती व्हावी यासाठी जिल्ह्यातल्या सर्व ८७० ग्रामपंचायतीत एक डिजीटल प्रचार रथ फिरणार आहे.

****

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातल्या सक्रिय क्षयरुग्ण शोधमोहिमेत ३४ क्षयरुग्ण आढळले, अशी माहिती, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉक्टर महेंद्र गावडे यांनी दिली. या रुग्णांवर उपचार केले जात आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी १९ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११८ वा भाग आहे.

****

चौदाव्या झेप साहित्य संमेलनाचं आयोजन येत्या एकोणीस तारखेला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वाळूज इथं करण्यात आलं आहे. संकल्प शिक्षण आणि सांस्कृतिक प्रतिष्ठान तसंच साप्ताहिक झेप यांच्या वतीनं कवियित्री हरणाबाई जाधव यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हे संमेलन आयोजित केलं जातं. या संमेलनात कविसंमेलन, परिसंवाद अशा कार्यक्रमांसह झेप पुरस्कारांचं वितरण केलं जाणार आहे.

****

खो–खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघांनी विजयी घोडदौड सुरु ठेवत उपान्त्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. भारतीय पुरुष संघानं काल पेरु संघाचा ७०– ३८ असा, तर महिला संघानं इराणचा १०० – १६ अशा मोठ्या गुण फरकाने पराभव केला.

****

तेविसाव्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचं उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल बारामती इथं करण्यात आलं. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावानं आयोजित होणाऱ्या कबड्डी, खोखो, कुस्ती आणि व्हॉलीबॉल या चार राज्यस्तरीय स्पर्धांसाठी दिले जाणारे ७५ लाख रुपयांचं अनुदान वाढवून एक कोटी रुपये करण्याची घोषणा पवार यांनी यावेळी केली. स्पर्धेत १६ महिला आणि १६ पुरुष संघ आणि ६०० पेक्षा अधिक खेळाडू सहभागी झाले आहेत.

****

एकोणवीस वर्ष मुले मुली गटातील राष्ट्रीय शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धेचं काल नांदेड इथं शानदार सोहळ्यात उद्घाटन झालं. देशभरातून आलेल्या सर्व राज्याच्या संघानी आपापल्या राज्याच्या झेंडा फडकवत संचलन केलं.

****